## Pimpri Chinchwad Police Commissionerate

### प्रेसनोट दिनांक २२/०६/२०२१

# टायगर ग्रुपच्या रायगड जिल्हा अध्यक्षास अटक
# खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा यांची कामगिरी

दिनांक १५/११/२०२० रोजी द विलेज हॉटेल, कामोठे, नवीमुंबई येथे बील देण्याचे कारणावरुन फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये वाद झाला होता. त्यावेळी टायगर ग्रुपचा अध्यक्ष निलेश चव्हाण याने ४-५ इसम सोबत घेवून जावून हॉटेल चालक व वेटर यांना मारहाण केलेबाबत **नवी मुंबई येथील कामोठे पोलीस ठाणे गुरनं. ५१२/२०२० भादवि कलम भादवि कलम ३०७, ३२६, १४३, १४७, १४९, ४२७, ५०४** अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर **गुन्हयातील मुख्य सुत्रधार व टायगर ग्रुपच्या रायगड जिल्हा अध्यक्ष निलेश चव्हाण हा फरार झाला होता.**

मा.पोलीस आयुक्त श्री कृष्ण प्रकाश, यांनी पोलीस आयुक्तालयातील रेकॉर्डवरील गुन्हेगार, पाहिजे, फरारी, तडीपार व गंभीर स्वरुपाचे गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांना वेळोवेळी चेक करुन, त्यांचेवर कठोर कारवाई करा, याबाबत सुचना दिल्याने, त्याअनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक खंडणी विरोधी पथक यांचे अधिपत्याखाली पथकाचे पोलीस उप-निरिक्षक शाकीर जिनेडी हे स्टाफसह चिंचवड पोलीस ठाणे हद्दीत रेकॉर्डवरील गुन्हेगारांची माहिती घेत, पेट्रोलिंग करीत फिरत असताना, पोलीस अंमलदार **आशिष बोटके व प्रदीप गोडांबे** यांना त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली कि, टायगर ग्रुपचा रायगड जिल्हा अध्यक्ष निलेश चव्हाण हा नवीमुंबई येथून फरार असून तो स्वतःचे अस्तिव लपवून देहूगाव परिसरात राहत आहे. सध्या तो क्वीन टाऊन्स सोसायटी समोर, चिंचवड, पुणे येथे आला आहे. अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने, सदर माहितीचा आशय मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री उत्तम तांगडे यांना कळविला असता, त्यांनी सदर ठिकाणी जावुन, खात्री करुन, पुढील कायदेशीर कारवाई करणे बाबत आदेश दिल्याने, खंडणी पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लागलीच खाजगी वाहनाने बातमीचे ठिकाणी जावुन, सापळा लावुन आरोपी **निलेश रमेश चव्हाण वय ३० वर्षे रा. साक्षी पार्क - २, मालेवाडी स्टॉप, बिल्डींग नंबर ०५/बी, फ्लॅट नंबर १०३, सुकापुर, ता.पनवेल, जि.रायगड** यास ताब्यात घेवून त्याचेकडे वरील गुन्हयाबाबत विचारपुस करता, त्याने सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिल्याने, त्याबाबत कामोठे पोलीस ठाणे येथे संपर्क करुन, शाहनिशा केली असता, आरोपी निलेश चव्हाण हा सुमारे सात महिन्यापासून फरार असल्याची खात्री झाली. त्यास पुढील कारवाई कामी कामोठे पोलीस ठाणे, नवी मुंबई पोलीसांच्या ताब्यात पुढील कार्यवाही करीता देण्यांत आले आहे.

**सदरची कारवाई पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाचे पोलीस आयुक्त श्री. कृष्ण प्रकाश, अपर पोलीस आयुक्त श्री.रामनाथ पोकळे, पोलीस उप आयुक्त श्री. सुधीर हिरेमठ, सहा. पोलीस आयुक्त डॉ. प्रशांत अमृतकर यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम तांगडे, पोलीस उप-निरीक्षक शाकीर जिनेडी, तसेच पोलीस अंमलदार, आशिष बोटके, प्रदीप गोडांबे, अशोक दुधवणे, निशांत काळे, विजय नलगे, गणेश गिरीगोसावी, किरण काटकर, सुधीर डोळस यांचे पथकाने केली आहे.**